P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक – ०५/०४/२०२४

**दि. ०४/०४/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ४३०/२०२४ भा.दं.वि. कलम ३२४,३२३,५०४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३१/०३/२०२४ रोजी २०/३० वा च्या सुमारास धनगरबाबा मंदिरासमोरील, वडाच्या झाडाखाली, थेरगाव पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०४/०४/२०२४ रोजी २३/२३ वा |
| फिर्यादी | :- | स्वप्निल महादेव गोडगे,वय २४ वर्षे,व्यवसाय चालक,रा. कुणाल हॉटेल समोर, टिव्हिस शोरुमच्या समोर, थेरगाव पुणे |
| आरोपी | :- | अतुल सावंत वय ३० वर्षे अंदाजे (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही)<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी कामावरून आल्यानंतर त्यांचा टेम्पो क्र एम.एच.१२ एस.एक्स.०५१५ हा धनगरबाबा मंदिरासमोरील, वडाच्या झाडाखाली, थेरगाव पुणे येथे उभा केला असता तेथे नमुद आरोपी आला व फिर्यादी व त्यांचा मित्र नरहरी डोंगरे यांना विनाकारण शिवीगाळ करु लागला फिर्यादीने त्यास शिवी देण्याचे कारण विचारले असता त्याला त्याचा राग आल्याने आरोपीने तेथे झाडाजवळ पडलेला लाकडी बांबु उचलुन फिर्यादी यांच्या डोक्यात मारुन त्यांना जखमी करून तेथुन पळुन गेला आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | भारत माने,पोलीस उप-निरीक्षक ८१०८८८८३५२ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली २००/२०२४ भा.द.वि.क. ४५२,३२३,५०४,५०६,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०४/०४/२०२४ रोजी ११/३० वा चे सुमारास वाजताचे सुमारास फिर्यादी यांचे राहते घरामध्ये रा. पल्ॅट न. ५, नवनाथ सोसा. ए/८, कृष्णानगर, चिंचवड पुणे. १९. येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०४/०४/२०२४ रोजी १७/४५ वा |
| फिर्यादी | :- | आकाश आनंद पवार वय-३२ वर्षे धंदा- व्यवसाय रा. पल्ॅट न. ५, नवनाथ सोसा. ए/८, कृष्णानगर, चिंचवड पुणे. १९ |
| आरोपी | :- | १.योगेश पवार, २.अनिकेत शिन्दे ३. धोत्रे (पुर्ण नाव पत्ता माहीती नाही )<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे राहते घराचे शेजारी पिंपरी चिंचवड महानगर पालिकेतर्फे वर्तमानपत्राचे वाचनालय असून ते काही कारणामुळे सदर वाचनालय हे बंद झाले असून सदर जागा हि रिकामी असल्याने आजूबाजूचे परीसरातील अनेक मुले तिथे गोळा होत असतात त्यामध्ये काही मुले सिगारेट, गुटखा खाणारी वासनांध मुले एकत्र गोळा होत असल्यामुळे फिर्यादी त्यांना वेळोवेळी येथे नशापाणी करून गोंगाट करू नका असे सांगितल्याने त्यांचेमध्ये भांडण होऊन फिर्यादी हे त्यांचे घरी असताना यातील आरोपी मजकुर यांनी फिर्यादी यांचे घरात जाऊन फिर्यादी यांना घराबाहेर ओढून मला व माझे मित्रांना पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या बंद पडलेल्या वर्तमानपत्र वाचण्याचे ठिकाणावर गप्पा मारण्यासाठी बसुन का देत नाही त्यांचेसोबत वाद का घालतो त्यांचे सोबतचा वाद मिटून घे अशी धमकी देऊन हाताने मारहाण करुन वाईट वाईट शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनिरी काकडे ९९७५७७२४६४ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ४३७/२०२४. भा.द.वि.कलम.४२०,३४२,५०६,१७० आयटी अँक्ट कलम ६६(सी), ६६(डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०१/०४/२०२४ रोजी सकाळी ०९.४५ ते दिनांक ०२/०४/२०२४ रोजी १९.३० वाजता चे दरम्यान राहते घरी ए-५०४, टिएरा व्हिवा सोसायटी, पुणे बँगलोर हायवे जवळ, बाणेर पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०४/०४/२०२४ रोजी २३.२१ वा. |
| फिर्यादी | :- | हर्ष संजय धिमण वय-३१ वर्षे धंदा-नोकरी रा.ए-५०४, टिएरा व्हिवा सोसायटी, पुणे बँगलोर हायवे जवळ, बाणेर पुणे |
| आरोपी | :- | १) मोबाईल नंबर ८१२७३२५८१० वरील इसम नामे मनोज अगरवाल<br>२)स्काईप अँप आयडी नंबर live:.cid.c941dfd0219bb105 व live:.cid.d51ab96b80bb2ff70 वरील इसम नामे रवीचंद्र<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मोबाईल नंबर वर ८१२७३२५८१० यावरुन इसम नामे मनोज अगरवाल या नावाने कॉल करुन मुंबई कस्टम ऑफिस ने फिर्यादीचे अधारकार्ड चे नावावर बनावट ५ पासपोर्ट, ३ बँक क्रेडिट कार्ड, ४ किलो कपडे, १ लॅपटॉप, ३५ हजार भारतीय रुपये व २०० ग्रॅम एम.डी.एम.ए ड्रग्ज पकडले आहे.आम्हाला तुमची चौकशी करायची आहे. असे खोटे सांगुन फिर्यादीस बळजबरीने स्काईप अँप डाऊनलोड करायला लावुन त्यांचे स्काईप अँप आयडी नंबर live:.cid.c941dfd0219bb105 व live:.cid.d51ab96b80bb2ff70 यावरुन फिर्यादीस आरोपी रवी चंद्र नावाचे इसमाने पोलीस असल्याची बतावणी करुन फिर्यादीस व्हिडीओ कॉल करुन पोलीस डिपार्टमेंट तुमच्या हालचालीवर लक्ष ठेवुन तुमची फायनानशियल कंडीशन चेक करणार आहे तुम्हाला जर कोणाचा कॉल आला तर स्पीकर ऑन करुन बोलायचे अशी बळजबरी करुन फिर्यादीस कन्टीन्यु व्हिडीओ कॉल वर थांबण्यास सांगुन फिर्यादीकडुन फिर्यादीचे लाईव्ह लोकेशन स्काईप अँप मागवुन घेवुन फिर्यादीचे हालचालीवर बंधन आणुन फिर्यादीस घरात बंधक बनवुन त्यांचे पंजाब नॅशलन बँक शाखा भंडारा खातेदार दरबार एन्टरप्रायझेस अकाऊंट नंबर ७७३०००२१०००४५३२ , आयएफएससी कोड पीयुएनबी ०७७३००० यावर ७,९६,४२५/- रुपये आरटीजीएस करायला सांगुन फिर्यादीची फसवणुक करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | राकेश सरडे पोलीस उप निरीक्षक ९९२३४०६४७६ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | ४२५/२०२४, भा.दं.वि. कलम ४०६,४०९,४२०,४६५,४६७,४७१,५०६,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१ सप्टेंबर २०१६ रोजीपासून ते आज रोजीपर्यंत टोम्सा कंपनीचे ऑफिस पत्ता- ४०३/गार्डन प्लाझा बिल्डींग, फाईव्ह गार्डन सोसायटीचे मागे, राहाटणी, पुणे येथे आणि आसाम बायो रिफायनरी प्रा.लि. (ABRPL) चे नुमालीगड, जिल्हा-गोलाघाट, राज्य-आसाम येथे या ठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि.०४/०४/२०२४ रोजी ११/३६ वा |
| फिर्यादी | :- | श्री.संदिप अशोक बनसुडे, वय ३५ वर्ष, धंदा - नोकरी (बिझीनेस डेव्हलेपमेंट डायरेक्टर- टोम्सा डिस्टील इंडिया प्रा. लि. TDIPL कंपनी) रा. फ्लॅट नंबर ए-१३, अवधुत बिल्डींग, गुरूविहार कॉलनी, पांजरपोळ, भोसरी, पुणे ऑफिस पत्ता- ४०३/गार्डन प्लाझा बिल्डींग, फाईव्ह गार्डन सोसायटीचे मागे, राहाटणी, पुणे |
| आरोपी | :- | १.श्री.रविंद्र भास्कर जयवंत,<br>२.महिला आरोपी<br>३.संजीव रमेश राजे<br>तिघेही संचालक- धवल डिस्टील ईव्याप प्रा. लि. (DDEPL) कंपनी पत्ता- फलॅट क्रमांक ए/३०१, मिथ्रास पार्क, सर्वे क्रमांक १२२, रेन्बो प्लाझा समोर, पिंपळे सौदागर, पुणे<br>**आरोपी क्रं १ अटक आहे** |
| तपशिल | :- | यातील फिर्यादी यांचे टोम्सा डिस्टील इंडिया प्रा. लि. (TDIPL) कंपनीस आसाम बायो रिफायनरी प्रा.लि. (ABRPL) चे नुमालीगड, जिल्हा-गोलाघाट, राज्य-आसाम येथे बांबु पासुन बायो-इथेनॉल निर्मीती प्रोजेक्ट मधील Fermentation व Evaporation या दोन सेक्शन उभारणीचे मिळालेले कॉन्ट्रॅक्ट आरोपी धवल डिस्टील ईवॅप प्रा.लि. (DDEPL) कंपनीचे संचालक आरोपी मजकुर यांनी विश्वास देवून सब-कॉन्ट्रॅक्ट कराराद्वारे DDEPL कंपनीला प्राप्त करवून घेतले आणि सदर प्रोजेक्टसाठी टोम्सा कंपनीकडून स्विकारलेल्या एकूण |

२६,२८,१३,६५२/- रुपयापैकी प्रत्यक्षामध्ये आसाम येथील प्रोजेक्ट साईटवर फक्त एकूण ५,८३,३१,९८२/- रुपयाचेच मटेरिअल व प्रोजेक्ट उभारणीचे कामकाज करुन उर्वरित २०,४४,८१,६७०/- रुपये रक्कम आरोपींनी DDEPL कंपनीचे व स्वतःचे फायदयासाठी इतरत्र वापरली व त्यांचा फसवणूकीचा उद्देश साध्य करण्यासाठी त्यांचे DDEPL कंपनीचे एस बँक खाते क्रमांक ०५५११८३९००००२३६५ चे बँक स्टेटमेंट मध्ये फेरफार करुन त्यांनी ABRPL प्रोजेक्टसाठी दिलेल्या पैशाचा विनीयोग इतरत्र केला असताना देखिल सदरचा खर्च ॠएङ्घ्ढ च्या प्रोजेक्टवर केल्याचा बनावट बँक-दस्तावेज अस्तित्वात आणला तसेच आरोपी क्रं १ याने त्याला TDIPL कंपनीने मुखत्यारधारक म्हणून दिलेले सहिचे अधिकाराचा गैरवापर करुन ABRPL प्रोजेक्टसाठीचे खोटया पर्चेस ऑर्डर ABRPL कंपनीस देवून प्रोजेक्टसाठी विश्वासाने सुपूर्द केलेल्या रक्कमेपैकी २०,४४,८१,६७०/- रुपये रक्कम आरोपींनी DDEPL कंपनीचे व स्वतःच्या फायदयासाठी वापरुन फिर्यादी कंपनीची अन्यायाने विश्वासघात करुन फसवणूक व नुकसान केले म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- के. डी. सपकळ, पोलीस उप निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी २१४/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २२(ब) व २९,

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. ०४/०४/२०२४ रोजी १६.०५ वा.चे सुमारास म्हाळुंगे एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे मोई गावातील भैरवनाथनगर येथीलजैन हॅड्रोलीक्स नावाचे शॉपचे समोर रत्याचेकडेला

गुन्हा दाखल :- दि. ०४/०४/२०२४ रोजी२२ः०६वा.

फिर्यादी :- कपिलेश कृष्णा इगवे, वय ३२ वर्षे पोलीस शिपाई २७१२, नेमणुक अंमली पदार्थविरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड

आरोपी :- १. इस्तियाक अब्बास चौधरी, वय २६ वर्षे, रा अण्णासाहेब मगरनगर, डि मार्टचे मागे, काळेवाडी, पुणे मुळ रादुधवली जि बस्ती राज्य उत्तर प्रदेश
२. अब्दुलकरीम अब्दुल्ला चौधरी, वय २६ वर्षे, राकिंगकाटा वजनकाटयाजवळ, कुदळवाडी, चिखली, पुणे मुळ रा सोहरतगड, जि सिध्दार्थनगर, राज्य उत्तरप्रदेश
पाहिजे आरोपी
३.सोमनाथचौधरी, रा कुदळवाडी, चिखली पुणे
**आरोपी क्रं १ व २ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ व २ याने त्यांचे ताब्यामध्ये एकुण ३,००,०००/- रुपये किंमतीचा माल ज्यामध्ये १६ ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ व ०३ मोबाईल असा मुददेमाल अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्री करीता कब्जात बाळगताना मिळुन आले. तसेच सदरचा मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ आरोपी क्रं ३ याचे कडुन आणला असल्याचे सांगितले. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि जाधव ९९२२९४७६२३

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण २२६/२०२४ भादवि का क २७९, ३०४(अ),४२७ मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०३/०४/२०२४ रोजी १८/४५ वा.चे सुमा मौजे कुरुळी गांवचे हददीत मारुती सुझूकी शोरुमचे पाठीमागील मोकळे जागेत

गुन्हा दाखल :- दि ०४/०४/२०२४ रोजी १४/४९ वा

फिर्यादी :- देवराम विठठल बुरुड, सहा.पोलीस उपनिरीक्षक, चाकण पोलीस स्टेषन

आरोपी :- गुरुदेव सिंग वय ४० वर्शे रा.नवीननगर नागपुर **आरोपी मयत झाला**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी ट्रेलर नंबर एम एच.४०/ए.के ५७७० यावरील ड्रायव्हर आरोपी याने त्याचे ताब्यातील ट्रेलर भरधाव वेगात, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवुन घेवुन जात असतांना तो कुरुळी टेकडी वरुन खाली पडुन अपघात होवुन अपघातात स्वतःचे गंभीर व किरकोळ दुखापतीस कारणीभुत होवुन स्वतःचे मृत्यूस कारणीभुत झाला आहे. तसेच ट्रेलर व त्यावरील मालाचे नुकसाणीस कारणीभुत झाला आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- **पोउपनि मोरखंडे** ९९२११११८१००

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ४३५/२०२४. भा.द.वि.कलम.४२०,४०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२२/०२/२०२४ रोजी ०८.३६ वा.चे पासुन ते दिनांक १३/०३/२०२४ रोजी पर्यंत. सी १८०२ गंगा ॲक्रोपोलीस नीअर बेला कासा पाषाण सुसरोड बाणेर पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०४/०४/२०२४ रोजी १९.१५ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १) Schoder Academy VIp34 या व्हॉट्स ग्रुपचे ॲडमिन मोबाईल नंबर धारक ४४७८३१०८७०७६ Catherine Macaulay व ९६५२०३१३३७२) ॲप sgztte.top/h55/<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद केले तारीख वेळी, ठिकाणी Schoder Academy VIp34 या व्हॉट्स ग्रुपचे ॲडमिन मोबाईल नंबर धारक 447831087076 Catherine Macaulay व ९६५२०३१३३७ यांनी फिर्यादीस ट्रेडिंग क्लासेस व शेअर मार्केट इन्वेस्टमेंट मधुन जास्तीचा परतावा देण्याचे अमिष दाखवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीस ट्रेडिंग व आयपीओ शेअर खरेदी करण्यास व ३१,६०,०००/- एवढी रक्कम गुंतविण्यास भाग पाडुन त्यानंतर सदर गुंतविलेल्या रकमेचा फिर्यादी यांनी वेळोवेळी परतावा मागितला असता आरोपी मजकुर यांनी फिर्यादीस गुंतविलेली रक्कम रिलिज करण्यासाठी ४,००,०००/- रु चॅरीटी डोनेशन स्वरुपात भरण्याकरीता फिर्यादीवर दबाब टाकुन फिर्यादीची गुंतविलेली रक्कम फिर्यादीस परत न करता एकुण ३५,६०,०००/-रुपयाचा अपहार करुन फिर्यादीची फसवणुक केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | राकेश सरडे पोलीस उप निरीक्षक, ९९२३४०६४७६ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ३१०/२०२४, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२, ३७(१) सह १३५ व भारतीय हत्यार कायदा ४, २५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक ०४/०४/२०२४ रोजी १६.१० वा.किंमतराम आसवानी भुयारी मार्ग, साई चौकाचे जवळ, पिंपरी, पुणे येथे सार्वजनिक रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०४/०४/२०२४ रोजी १९.३५ वा. |
| फिर्यादी | :- | रोहित रघुनाथ वाघमारे, वय ३२ वर्षे, पोलीस शिपाई, बक्कल नं. २३५५, नेमणुक पिंपरी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड. |
| आरोपी | :- | अमन अजिम शेख, वय २२ वर्षे, रा. कुणाल हॉटेल मागे, आर्य समाज चौक, पिंपरी, पुणे.<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी यास मा. पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ १, पिंपरी चिंचवड यांचे कडील दिनांक १६/०८/२०२३ रोजीचा तडीपार आदेश क्रमांक ३९/२०२३, सुधारीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६(१)(अ)(ब) प्रमाणे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे शहर पोलीस आयुक्तालय व पुणे ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता दिनांक ०५/०१/२०२४ रोजी पासून हद्दपार करण्यात आले असताना, तो सदर आदेशाचा भंग करून, तसेच आपले कब्जात २००/- रू.किं.चा एक लोखंडी कोयता बेकायदेशिररित्या जवळ बाळगताना दिनांक ०४/०४/२०२४ रोजी १६.१० वा. किंमतराम आसवानी भुयारी मार्ग, साई चौकाचे जवळ, पिंपरी, पुणे येथे सार्वजनिक रोडवर मिळुन आला आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पो हवा. १६११ पवार ७४४७५७३९७५ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ४२३/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०३/०४/२०२४ रोजी २१.३० वा सुमा हॉटेल मॅंगो ट्री, कस्पटेवस्ती, वाकड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०४/०४/२०२४ रोजी ००.५५ वा |
| फिर्यादी | :- | स्वप्निल मारुती खेतले पोलीस हवालदार बनं.१३६६ नेमणुक वाकड पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय |

| | | |
|---|---|---|
| आरोपी | :- | १)पिंटु धर्मचरण बिश्वास वय ३६ वर्षे रा.हॉटेल मॅंगो ट्री, मधील स्टाफ क्वॉटर्रस मध्ये कस्पटेवस्ती, वाकड पुणे<br>२)हॉटेल मालक अजित दिलावर इनामदार<br>**आरोपी क्र १ यास सीआरपीसी कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस दिली आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी क्र १ हा बेकायदा बिगर परवाना त्याचे हॉटेल मालक आरोपी क्र २ यांनी आणुन दिलेली एकुण ०१,०४,५८०/- रु किं चे विदेशी दारु ओळखीचे लोकांना विकणेबाबत सांगीतलेले असता आरोपी क्र १ हा ओळखीचे लोकांना विदेशी दारु विक्री करीत असताना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि चव्हाण ९५४५४८६०२८ |